
सन १९२६

॥ ...गोमाता विजयते ॥

# श्रीगोवर्धन पुस्तकमाला.

पुष्प ४ थें.

# धेनुगाथा.



REFBK-0003152
REFBK-0003152

...त दोन आणे [ प्रति २०००

आषाढ शके १८४८

# प्रार्थना.



गोवधामुळें सर्व भारतभूमि अपवित्र बनून गेली आहे! गोमातेच्या अंतःकाळच्या केविलवाण्या हंबरड्यांनीं वातावरणा कहर करून सोडला आहे. आशास्थितींत, गोजननीच्या य स्मशानस्थानांत आज आपलीं सर्व धर्मकृत्यें निःसंशय व्यर्थ होत आहेत ! यासाठीं नवीं मंदिरें बांधणें, तीर्थयात्रा करणें, अन्नसत्रें, सदावर्तें व पाणपोया घालणें इ. कार्यांपूर्वीं गोमातेची होत असलेली भयंकर दुर्दशा ध्यानीं आणा व तिच्या प्राण रक्षणार्थ देवानें दिलेल्या संपत्तीचा विनीयोग करा. लग्नादि कार्यांतं खर्च कमी करा. छानछोकी व चैनीला फांटा द्या. नाटक सिनेमा नाच बैठकी तमाशादि रंगढंगादिकांत दंग होऊन पैशाचा अपव्यय करूं नका. एकच धर्म निरंतर दृष्टिपुढें ठेवा. गोमातेच्या संरक्षण कार्यासाठीं झटणाऱ्या गोवर्धन संस्थेला सर्वांआधीं साह्य करा, अशी प्रार्थना आहे.

| | |
|---|---|
| श्रीगोवर्धनसंस्था वाई. | श्रीगोवर्धनसंस्था मुंबई. |
| पो. वाई, जि. सातारा. | कांदेवाडी, मुंबई नं. ४ |

॥ श्रीगोपालकृष्ण प्रसन्न ॥

REFBK-0003152
REFBK-0003152

# गाईचे उपकार आठवा.

दोन शब्द लिहावे अशी गोभक्ताची आज्ञा. ती पाळली पाहिजे. प्रस्तुत 'धेनुगाथा' लोकांनीं काळजीपूर्वक वाचावी. गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें, आहसेचें व्रत, गाईचे उपकार, व गाईची सेवा याबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकाराममहाराज, श्रीसमर्थ-महाराज, श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी, श्रीबाळकृष्णमहाराज चौंडे अशासारख्या सत्पुरुषांनीं जो उपदेश केला आहे तो मनांत ठेवून त्याप्रमाणें वागावें हा आपला सांसारिकांचा धर्म. त्यांनीं 'आधी केलें मग सांगितलें' तें ही आपण न ऐकावें मग आपली धन्यच ह्मणावी ! घरोघर दुभतें असावें. खरी श्रीमंती मनमुराद दुभत्यांतच आहे. गाईचें दूध हें पृथ्वीवरील अमृत आहे, हें मी अनुभवानें सांगतों. यानें शरीर व मन प्रसन्न राहतें. प्रत्येकाच्या पोटांत रोज गाईचें एकशेर दूध गेलेंच पाहिजे असें वैद्यकाचार्य वाग्भट सांगतात. भरपूर दूध नाहीं ह्मणून प्रजा पुष्टितुष्टि जाऊन रोगी व अल्पायु झाली. नाटकें, सिनेमा, चैनीचे सर्व पदार्थ, चहादि मादक पेयें यांत पै खर्च न करितां पोटभर दूध प्या. गाईचें दूध, गाईच्या दुधाचें दहीं, ताक व लोणी सेवन करा, डॉक्तर वैद्यांची घरें धुंडावीं लागणार नाहींत. ह्या गोपालकृष्णाच्या व शिवछत्रपतीच्या भरतभूमींत गाईवर रोजरोज जे

भयंकर प्राणहारी प्रसंग येत आहेत त्यांची कल्पना करतांही अंगावर कांटा येतो. त्या संकटाचा प्रतीकार श्रीगोपाळकृष्णच करितील तेव्हां करोत, आपण सर्व चैनीस व फालतू गोष्टींस पूर्ण फांटा देऊन घरांत भरपूर गोदुग्धाचा पुरवठा करण्याचा निश्चय केला पाहिजे, तरच धडगत आहे. गाई आहेत तर आपण आहोंत. गाईचें रक्षण--नव्हे गाईंची सेवा, मनोभावें आपण करावी. त्यांतच आपलें कल्याण आहे.

मुंबई, आषाढी एकादशी<br>शके १८४८ } **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

७८

१९२६



# गाईचे उपकार.

3942

[ कवि—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर ]

पद.

गायचि एका माय जगाची कोण तिचे उपकार।
गड्यांनो ! थोर तिचे उपकार ॥ १ ॥

हिरवा चारा खाउनि सोडी तोंडि दुधाची धार।
खचितची अमृताची ती धार ॥ २ ॥

हिंदु यवन हा भेद नसे तिज, ती सकळा आधार।
गायचि सर्व सुखासी थार ॥ ३ ॥

शेतीचा ती प्राणचि केवळ, धान्य कसें मिळणार।
तिजविण कोण कसें जगणार ॥ ४ ॥

आई केवळ बाळपणीं, ही जन्मवरी देणार।
दुधतें-पुष्टितुष्टिचें सार ॥ ५ ॥

देववृंद हा धेनुशरीरीं तिजविण भव निःसार।
गायचि श्रीकृष्णासी प्यार ॥ ६ ॥

गोब्राह्मणप्रतिपालनकर्ता भक्त शिवाजी फार।
शिरिं घ्या गोसेवेचा भार ॥ ७ ॥

गोसेवा नच घडतां हातीं संसृति हा जोजार !
सेवा-हेचि भवाचें सार ॥ ८ ॥

हिंदु यवन हो ! हिंदबंधुहो ! गाईचे उपकार।
आठवा मनांत वारंवार ॥ ९ ॥

# धेनु गाथा.

## श्रीज्ञानेश्वरमहाराज.

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते
ते पुण्यमासाद्य सुरेंद्र लोक-
मश्नंति दिव्यान्दिवि देव भोगान्

देख पां गा किरीटी । आश्रम धर्मांचिया राहाटी । विधिमार्गा कसवटी । जे आपणचि होती ॥ ७ ॥ यजन करितां कौतुकें । तिहीं वेदांचा माथा तुके । क्रिया फळेंसी उभी ठाके । पुढां जयां ॥ ८ ॥ ऐसे दीक्षित जे सोमप । जे आपणचि यज्ञाचें स्वरूप । तिहीं तया पुण्याचेनि नांवें पाप । जोडिलें देखें ॥ ९ ॥ जे श्रुतित्रयातें जाणोनि । शतवरी यज्ञ करूनि । यजिलिया मातें चुकोनि । स्वर्गा-वारिती ॥ १० ॥ जैसें कल्पतरू तळवटीं । बैसोनि झोळिये देतसे गांठी । मग निदैव निघे किरीटी ॥ दैन्याचि करूं ॥ ११ ॥ तैसे शतक्रतु यजिलें मातें । कीं इप्सिताति स्वर्ग सुखातें ॥ आतां पुण्य कीं हें निरुतें । पाप नोहे ॥ १२ ॥ म्हणोनि मजविण पाविजे स्वर्गु । तो अज्ञानाचा पुण्य मार्गु । ज्ञानिये तयातें उपसर्गु । हानि म्हणती ॥ १३ ॥ एऱ्हवीं तरी नरकींच दुःख । पावोनि स्वर्गा नाम कीं

सुख । वांचूनि नित्यानंद गा निर्दोष । तें स्वरूप माझें ॥ १४ ॥ मज येतां पै सुभटा । या द्विविधा गा अव्हांटा । स्वर्गु नरकु या वाटा चोरांचिया ॥ १५ ॥ स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ १६ ॥ आणि मजचि माजीं असतां । जेणें मी दुव्हावे पांडुसुता । तें पुण्य ऐसें म्हणतां । जीभ न तुटे काई ॥ १७ ॥ परि हें असो आतां प्रस्तुत । ऐकें या परी जे दीक्षित । यजूनि मातें यांचित स्वर्ग भोगु ॥ १८ ॥ मग मी न पविजे ऐसें । जें पापरूप पुण्य असे । तेणें लाधलेनि सौरसें स्वर्गा येती ॥ १९ ॥ जेथ अमरत्व हें सिंहासन । ऐरावता सारिखें वाहन । राजधानी भुवन अमरावती ॥ २२० ॥ जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें । जिये गांवीं खिल्लारें कामधेनूंचीं ॥ २१ ॥ जेथ ओळंगे देव पाइका । सैंघ चिंतामणीचिया भूमिका । विनोदवनवाटिका । सुरतरूंचिया ॥ २२ ॥ गंधर्व गात गाणीं । जेथ रंभे ऐशिया नाचणी । उर्वशी मुख्य विलासिनी अंतौरिया ॥ २३ ॥ मदन वोळगे शेजारें । जेथ चंद्र शिंपे सांवेंर । पवना ऐसे म्हाणियारे धांवणें जेथ ॥ २४ ॥ पैं बृहस्पती मुख्य आपण । ऐसे स्वस्ती श्रियेचे ब्राह्मण । तांटिये सुरगण । बहुवस जेथ ॥ २५ ॥ लोकपाळ रांगेचे । राउत जिये पदवीचे । उच्चैःश्रवा खांचे । खोलणियें ॥ २६ ॥ हे असो बहु ऐसें । भोग इंद्र सुखा सरिसे ते भोगिजती जंव असे पुण्यलेशु ॥ २७ ॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं ।
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ।
एवंत्रयी धर्ममनुप्रपन्ना । गतागतं
काम कामा लभंते ॥

मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे । आणि येऊं लागती माघारे । मृत्यु लोका॥ २८ ॥ जैसा वेश्याभोगी कवडा वेंचे । मग दारहीं चेवूं न ये तियेचें। तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें काय सांगों ॥ २९ ॥ एवं थितिया माते चुकले । जिहीं पुण्यें स्वर्ग कामिले । तयां अमरपण. तें वावो जालें । अंतीं मृत्यु लोकु ॥ ३० ॥

ज्ञानेश्वरी अ. ९ वा.

कां बाहु तोडोनि पचविजे । मग भुकेची पीडा राखिजे । ना ना देऊळ मोडून कीजे पौळी देवा ॥ १२० ॥ तैसी हिंसाचि करूनि अहिंसा । निफजविजे हा ऐसा । पै पूर्व मीमांसा । निर्णो केला ॥ १२१ ॥ जे अवृष्टिचेनी उपद्रवें । गादलें विश्व आघवें । म्हणोनि पर्जन्येष्टी करावे । नाना याग ॥ १२२ ॥ तंव तिये इष्टीचिया बुडीं । पशु हिंसा रोकडी । मग अहिंसेची थडी । कैंची दिसे ॥ १२३ ॥

ज्ञानेश्वरी अ. १३ वा.

\+ \+ \+ ×

जगात्तिया सुखोद्देशें । शरीर वाचा मानसें । रहाटणें तें अहिंसे रूप जाण ॥

\+ + + ×

जीवाचेनि नांवें । तृणातेंहि नोलांडावें । मग न लेखितां जावें । हें कें गोठी ॥

\+ + + +

चिखलीं रुतली गाय । घड माकड न पाहे ॥

\+ × × +

## अभंग.

योगियां मुनीजनां ध्यानीं । तें सुख आसनीं शयनीं ॥ हरि सुख फावलें ॥धृ०॥ गोकुळीच्या गौळिया । गोपी गोभना सकळा ॥२॥ बाप रखुमादेवीवर विठ्ठलें । तें सुख संवगडिया दिधलें ॥ ३ ॥

---

# श्री नामदेव महाराज

१

आकाशवाणी होय सांगे सकळांसी । तळमळ मानसीं करूं ॥ १ ॥ देवकीच्या गर्भा येईल भगवान । रक्षील ब्राह्मण गाई भक्त ॥ २ ॥ उतरील भार मारील दैत्यांसी । आनंद सर्वांशी करील तो ॥ ३ ॥ रोहिणी उदरीं शेष बळी भद्र । यादव समग्र व्हारे तुम्ही ॥ ४ ऐकोनियां ऐसे आनंद मानसीं । येती स्वस्थळासी नामा ह्मणे ॥ ५ ॥

२

शिवादि वंदिती ज्याचे पायवणी । त्यासी पायांवरी न्हाणी यशोदा ते ॥ १ ॥ नंद पुण्याचा लेखा न कळे आह्मांप्रती । शुक परिक्षिती सांगतसे ॥ २ ॥ सनकादिक ज्याचे ध्यानीं जाले पिसे । गायी चारीतसे गोकुळांत ॥ ३ ॥ गडियांसी काला वांटीत श्रीधर । कौतुक सुरवर पाहताती ॥ ४ ॥ नामा ह्मणे सुख देईल भक्तांसी । वधील दुष्टासी स्वामी माझा ॥ ५ ॥

३

आपुली करणी न विचारी मनीं । वायां काय ठेवूनि बोलजिवा ॥ १ ॥ खाटकी जो चेपी पशूची नरडी । अवचिता करंगळी सांपडली ॥ २ ॥ मेलों मेलों ह्मणुनि गडबडां लोळे । परि कापी गळे आठवीना ॥ ३ आपुलें ह्मणवूनि विव्हळतसे । खदखदा हांसे दुसऱ्यासी ॥ ४ ॥ वाटपाड्यानें घर खाणोनि घेतलें । जितुकें मेळविलें तितुकें नेलें ॥ ५ ॥ आपुलें नेलें ह्मणऊनि खळखळां रडे । परि घेतां दरवडे आठवीनां ॥ ६ ॥ सोंनाराचे घरीं पडिलेंसे खाण । चोरिलें सुवर्ण तेंहि नेलें ॥ ७ ॥ आपुलें नेलें ह्मणऊनि मोकलितो धाय । ठकविल्या आयाबाया तें आठविना ॥ ८ ॥ तराळाचे घरीं आला असे जेव्हां । ह्मणतसे देवा काय करूं ॥ ९ ॥ दुसऱ्यासी मागतां परम सुख वाटें । आपण देतां फुटे काळीज तें ॥ १० ॥ जन्मवरी पोशिलें लेंकुराचे परी । हातीं घेउनि सुरी उभा राहे ॥ ११ ॥

गर्दन सुळीं देतां म्हणे काय केलें । पुढल्यासी मारिलें आठवीना ।। १२ ।। नामा म्हणे विष्णुदास ऐसे जे निर्लज्ज । त्यांसी पंढरिराज केंवि भेटे ॥ १३ ॥

४

पोटीं अहंतेसी ठाव । जिव्हे सकळ शास्त्रांचा सराव ॥ १ ॥ भजन चालिलें उफराटें । कोण जाणें खरें खोटें ॥ २ ॥ सजिवासी हाणी लाथा । निर्जिव पायीं ठेवी माथा ॥ ३ ॥ सजीव तुळसी तोडा । पूजा निर्जीव दगडा ॥ ४ ॥ बेलाकरी तोडातोडी । शिवा लाखोली रोकडी ॥ ५ ॥ तोंड धरून मेंढा मारा । म्हणति सोमयाग करा ॥ ६ ॥ सिंदूर माखुनिया धोंडा । त्यासी भजति पोरें रांडा ॥ ७ ॥ अग्निहोत्राचा सुकाळ । कुश पिंपळाचा काळ ॥ ८ ॥ मृत्तिकेची पूजा नागा । जित्या नाग घेती डांगा ॥ ९ ॥ नामा म्हणे अवघे खोटें । एक हरिनाम गोमटे ॥ १० ॥

---

## श्री एकनाथमहाराज.

### अभंग १

साधु म्हणावें तयासी । दया क्षमा ज्याच्या दासी ॥ १ ॥ जयापाशीं नित्य शांती । संत जाणा आत्मस्थिती ॥ २ ॥ ऋद्धि सिद्धि ज्याच्या दासी । भुक्ति मुक्ति पाया पाशीं ॥ ३ ॥ एका जनार्दनीं साधु । जयापाशीं आत्मबोधु ॥ ४ ॥

सर्वां भूतीं दया । साधु म्हणावें ऐशिया ॥ १ ॥ जग ब्रह्मरूप जाण । हेंचि साधूचें लक्षण ॥ २ ॥ सर्वां भूतीं समदृष्टी । तोचि साधु इये सृष्टी ॥ ३ ॥ एका जनार्दनी संत । नित्य साधी आत्म-हित ॥ ४ ॥

३

वंदू श्री भाविकजन । ऐकावें साधन पावन । कलयुगीं अज्ञान अभाविक पैं होती ॥ १ ॥ न कळे श्रुती वेदशास्त्र । पुराण न कळे पवित्र । ज्ञान ध्यान गायत्री मंत्र जप तप राहिले ॥ २ ॥ यज्ञ यागादिक दान । कोणा न कळे महिमान । अवघे जाहले अज्ञान । न कळे कांहीं ॥ ३ ॥ लोपले मंत्र औषध । गाईस न निघे दुग्ध । पतिव्रता ज्या शुद्ध । व्यभिचार करिती ॥ ४ ॥ ऐशियानें करावें काय । तिहीं ध्यावे विठ्ठल पाय । एका जनार्दनी ध्याय विठ्ठल नाम आवडी ॥ ५ ॥

४

भजन चालिलें उफराटें । कोण जाणे खरें खोटें ॥ १ ॥ अग्निहोत्राचा सुकाळ । वडा पिंपळासी काळ । तिन्ही देव पिंपळांत । अग्निहोत्रीं केला घात ॥ ३ ॥ म्हणती सोमयाग करा । सुख धरूनि मेंढा मारा ॥ ४ ॥ शेंदूर माखुनियां धोंडा । चाळविती पोरें रांडा ॥ ५ ॥ एका जनार्दनीं नेम । सर्वां ठायीं पुरुषोत्तम ॥ ६ ॥

५

देव म्हणती मेसाबाई । पूजा अर्चा करिती पाही ॥ १ ॥ नैवेद्य वहाती नारळ । अवघा करिती गोंधळ ॥ २ ॥ मेंढरें बोकड मारिता । सुकी रोटी तया म्हणती ॥३॥ बळेंचि आणिताती अंगा। नाचताती शिमगीं सोंगा ॥ ४ ॥ सकळ देवांचा हा देव । विसरती तया अहंभाव ॥ ५ ॥ एका जनार्दनीं ऐसा देव । येथें कैचा आमुचा भाव ॥ ६ ॥

६

फजितीचे देव मागती घुटी रोटी । आपणालागीं जगा पीडिती काळ तोंडें मोठी ॥ १ ॥ नको तया देवा आठव मजसी । विठ्ठल मानसी आम्हीं ध्याऊं ॥ २ ॥ अविचारी देव अविचारी भक्त देवाकारणें करिती पशुघात ॥ ३ ॥ एका जनार्दनी जळो ऐसा देव तो भांड । विठ्ठल विठ्ठल न ह्मणे त्याचे काळे तोंड ॥ ४ ॥

७

प्रेमें पूजी मेसाबाई । सांडोनिया विठाबाई ॥ १ ॥ काय देईल ती ओंगळ । सदाखाय अमंगळ ॥ २ ॥ आपुलीये इच्छे साठीं । मारी जीव लक्ष कोटी ॥ ३ ॥ तैसी नोहे विठाबाई । सर्व दीनांची तो आई ॥ ४ ॥ न सांडीचि विठाबाई । एका जनार्दन पायीं ॥ ५ ॥

८

म्हणती देव मोठे मोठे । पूजिताती दगड गोटे ॥ १ ॥ कष्ट नेणती भोगिती । वहा दगडातें म्हणती ॥ २ ॥ जीत जीवा करूनि

वध । दगडा दाविती नैवेद्य ॥ ३ ॥ शांडा पोरें मेळ जाला । एक ह्मणती देव आला ॥ ४ ॥ नाक घासुनी गव्हार । देवा म्हणती गुन्हेगार ॥ ५ ॥ एका जनार्दनीं म्हणे । जन भुलले मूर्खपणें ॥ ६ ॥

९

वेद बोलिला जो जो गुण । तो तो नव्हेचि पठन ॥ १ ॥ वेदें सांगितलें न करी । ब्रह्मद्वेषी दुराचारी ॥ २ ॥ न करा सुरापान कन्यांगाविक्रय जाण ॥ ३ ॥ ऐसी वेदाची मर्यादा । न कळेचि मतिमंदा ॥ ४ ॥ निजमुखें स्वयें बोलें वेदु । न करावा परापवादु ॥ ५ ॥ एका जनार्दनीं शरण । वेदाचें नोहे आचरण ॥ ६ ॥

१०

ब्राह्मणा स्वधर्म नित्य नैमित्तिक । व्हावें उपासक वेदांलागीं ॥ १ ॥ स्नान संध्या वंदन हेंचि नित्य कर्म । तैसेंचि हें वर्म पितृतृप्ति ॥ २ ॥ ब्रह्मयज्ञ आणि अग्नीची ते पूजा । तेणें अधोक्षजा पाविजेति ॥ ३ ॥ अतिथी आलिया तया अन्नदान । करावें तर्पण द्रव्ययोगें ॥ ४ ॥ भूतदया गाई पशूतें पाळावें । मुखीं उच्चारावें रामनाम ॥ ५ ॥ एका जनार्दनीं हेंचि नित्य कर्म । तेणें परब्रह्म हातां चढे ॥ ६ ॥

११

जितां मायबापा न घालिती अन्न । मेल्या प्रेतांवरी करी पिंडदान ॥ १ ॥ पहा पहा संसारीचा कैसा आचारु । जिता अबोला मा मेल्या उच्चारु ॥ २ ॥ जित्या मायबापा न करिती नमन । मेल्या मागें करिती मस्तक वपन ॥ ३ ॥ जित्या मायबापा घड

गोड नाहीं । श्राद्धीं तळण मळण परवडी पाही ॥ ४ ॥ जित्या मायबापा गाली प्रदान । मेल्या त्याचेनि नांवें देती गोदान ॥ ५ ॥ जित्या मायबापा न दे प्याया पाणी । मेल्या पितरांलागीं बैसती तर्पणीं ॥ ६ ॥ प्याया पाणी न घालिती सासरा जिता । पिंडापाशीं येती मग दंडवता ॥ ७ ॥ एका जनार्दनीं कृपेचें तान्हें । विधी निषेध दोन्ही आतळों नेदी मनें ॥ ८ ॥

१२

गौ आणि कन्या कथेचा विकरा । चांडाळ निर्धारा पापराशी ॥ १ ॥ तयाच तें मुख न पाहती जन । अपवित्र दुर्जन पातकी तो ॥ २ ॥ एका जनार्दनीं दोषा न परिहार । भोगिती अघोर कल्पकोटी ॥ ३ ॥

१३

आपुला न टाकीं पां आचार । उपजले कुळींचा वेव्हार । स्वधर्म तो सार पाळीं पाळीं बापा ॥ १ ॥ त्यातें म्हणणें संसार । येर बोलणें असार । निष्ठावंत जे नर । देवाचि समान ॥ २ ॥ अतीतासी द्यावें अन्न । गोब्राह्मणांचें पूजन । मुखीं नाम स्मरण । तोचि एक संसारी ॥ ३ ॥ सांडोनियां गृहदारा । धांव घेतली डोंगरा । अंतरीं भरला सारा । विषयीक भाव ॥ ४ ॥ बकाचे परिध्यान । नको नको अनुष्ठान । एका जनार्दनीं मन । स्थिर करीं सर्वदा ॥ ५ ॥

म-का-७१



लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तुजंतोर्न हि तत्र चोदना ।
व्यवस्थितिस्तेषुविवाहयज्ञ सुरा ग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥

—भागवत अध्याय ५ वा.

वेदें न करितां प्रेरणा । विषयांवरी सहज वासना । स्वभावें सकळ जना । सदा जाण सर्वांसी ॥ ८ ॥ मांस सेवना मद्यपाना । मिथुनी भूत मैथुना । ये अर्थी सर्व जनां । तीव्र वासना सर्वदा ॥ ९ ॥ तेथें सेव्या सेव्य परवडी । विवंचना कोण निवडी । लागली विषयांची गोडी । ते अनर्थ कोडी करतील ॥ १० ॥ आगी लागलिया कापुसा । विझवितां न विझे जैसा । तेवी विषयवंता मानसा । विवेकु सहसा उमजेना ॥ ११ ॥ झाल्या लोलिंगता बडिशा । निजमरण विसरे मासा । कां मुठी चणियांच्या आशा । नळीमाजीं आपैसा वानरू अडके ॥ १२ ॥ दूध मिळालिया मांजर । न म्हणे द्विज अत्यंज घर । तेवीं विषय उन्मत्त नर । न करिती विचार । सेव्या सेव्य ॥ १३ ॥ कां खवळल्या विषय चाडें । योनि संकरू घडेल पुढें । या लागीं वेदें चोखडें । वर्णाश्रम पाडें विभाग केले ॥ १४ ॥ जैसें अफाट पृथ्वीचें अंग । तेथें सप्तद्वीपें करूनि विभाग । मग भिन्नाधिकारें चांग । धरा सांग आक्रमिली ॥ १५ ॥ कां अनावृत मेघजळा । धरणें धरूनि घालिजे तळां । मग नेमेचि ढाळें ढळां । पिकालागी जळा काढिजे पाट ॥ १६ ॥ आणि पवना नादा कारा । साधूनि कीजे वाजंतरा । मग जेवीं नाना ध्वनीं मधुरा । वाजविजे यंत्रा सप्तस्वरीं ॥ १७ ॥ तैसें उच्छृंखळा विषयांसी । वेदें नेमिलें नेमेसीं । तेचि वेदाज्ञा ऐसी । एक तुजपासीं सांगेन ॥ १८ ॥ .... ....

८६३

सेवावया आमिषा । वेदें नेमु केला कैसा । न घडावया पशु हिंसा । संकट आयासा स्वयें द्योती ॥ ३२ ॥ आवडीं खावया मांसा । अथवा स्वर्गाचिया आशा । जे करिती पशुहिंसा । तया पुरुषां अधःपतन ॥ ३३ ॥ निष्काम कर्मी पशुहिंसा । करी तरी तो निष्काम कैसा । तेथ निगमाचा नेमु ऐसा । मुख्य अहिंसा सर्व धर्मी ॥ ३४ ॥ नित्य न करावया मांस भक्षण । यज्ञीं पुरोडाश सेवन । तेंहि परिमित जाण । स्वेच्छा मांसाशन वारिलें वेदें ॥ ३५ ॥ याग करूनि सौत्रामणी । प्रवर्तावें सुरापानीं । हे वेदाज्ञा जो सत्य मानी । तो स्वधर्माचरणीं नागवला ॥ ३६ ॥ जे कर्मी मद्यपान घडे । तो स्वधर्म ह्मणतां जीभ झडे । लोलुपते भुलले बापुडे । वेद विषयांकडे ओढिती ॥ ३७ ॥ यागु करितां सौत्रामणी । स्वयें न व्हावें मद्यपानी । तें यज्ञशेष अवघ्राणी । परी सर्वथा वदनीं घालूं नये ॥ ३८ ॥ हें विषयांचें त्रिविध विंदान । मैथुन मांस भक्षण सुरापान । यदर्थी निवृत्तीचि प्रमाण । हें मनोगत पूर्ण वेदाचें ॥ ३९ ॥ विषयांपासूनि निवृत्ति । वेद विभागें हेंचि द्योती । परी धरावी विषयासक्ती । हे वेदोक्ती सर्वथा न घडे ॥ ४० ॥ वेंचोनियां निजधन । करोनियां विवाह यज्ञ । सेवावें मद्यमांस मैथुन । हें वेदवचन कदा न घडे ॥ ४१ ॥

---

यद्घ्राण भक्षो विहितः सुरायास्तथा पशोरालभनं न हिंसा ।
एवं व्यवायः प्रजया न रत्या इमं विशुद्धं न विदुः स्वधर्मम् ॥ १३ ॥

वेद विहित कर्माचरण । तेथ सर्वथा नव्हे पतन । जेथ चुके वेद विधान । तेथें पावे पतन सज्ञान ॥ ६१ ॥ वेदींच्या अर्थवादा

सरिशा । मनीं बांधोनि भोगाशा । यज्ञमिषें पशुहिंसा । भोगलिप्सा करूं धांवती ॥ ६२ ॥ वेदें बोलिलें आलभन । त्या नांव म्हणतीं पशुहनन । हें सकाम मानिती विधान निष्कामा हनन कदा न घडे ॥ ६३ ॥ निष्कामासी याग यजन । स्वधर्मार्थ करावे यज्ञ । तेथ पशूंचें आलभन । सर्वथा हनन करूं नये ॥ ६४ ॥ पशूचें करूं नये हनन । देवतोद्देशें अंगस्पर्शन । या नांव बोलिजे 'आलभन'। हें यज्ञाचरण निष्काम ॥ ६५ ॥ हरिश्चंद्राच्या यागीं शुनःशेप पशुप्रसंगीं । तेणं घावो लागों नेदितां अंगीं । वेदोक्त प्रयोगीं यज्ञसिद्धी केली ॥ ६६ ॥ वेदोक्त मंत्र भागार्थ । देवा करवीं करोनि समस्त । आपण झाला निर्मुक्त । हा ऋग्वेदार्थ ब्राह्मणीं ॥ ६७ ॥ या परी पशुघात । यज्ञीं न लगे निश्चित । तो हरिश्चंद्र यागार्थ पशुघात निवारी ॥ ६८ ॥ तेथ मीमांसकांचें मत । देवतोद्देशें जो पशुघात । या नांव आलभन म्हणत स्वर्ग फलार्थ आवश्यक ॥ ६९ ॥ केवळ मांस भक्षणार्थ जे करिती पशुघात । हिंसा दोष तेथें प्राप्त । ऐसें बोलती मीमांसक ॥ ७० ॥ देवतोद्देशें पशूंचा घात । तेणें स्वर्गभोग होय प्राप्त । तोही भोगक्षयें क्षया जात । तेणें हिंसा प्राप्त याज्ञिकां ॥ ७१ ॥ याग करितां सौत्रामणी । पुरोडाश घ्यावा अवघ्राणी । परी प्रवर्तवें सुरापानीं । हें वेदविधानीं असेना ॥ ७२ ॥ एवं जेथें पशुहनन । तें कर्म सदोष पूर्ण । यालागीं तेथ अधःपतन । बोलिले जाण याज्ञिकांसी ॥ ७३ ॥

ये त्वनेवंविदोऽसन्तः स्तब्धाः सदभिमानिनः
पशुन्द्रुह्यंति विस्रब्धाः प्रेत्य खादन्ति ते च तान्॥

नेणोनि शुद्ध वेद विधांनातें । अति गर्वाचेनि उद्धतें । आपणियां मानूनि ज्ञाते । अविधी पशूतें घातु करिती ॥ ७७ ॥ केवळ अभि० चार मतें । पावोनि सकळ भोगातें । ऐशिया मानोनि विश्वासाते । स्वेच्छा पशूते घात करिती ॥ ७८ ॥ अविधी पशूतें वधिती । त्या याज्ञिकांचे देहांती । मारिले पशु मारूं येती । झळकत कांती घेऊ-नियां ॥ ७९ ॥ एवं निमाळिया यज्ञिकांसी । मारिले पशू भक्षिती त्यांसी । जैसें सेविलें विष प्राणियांसी । ग्रासी प्राणासी समूळ ॥ ८० ॥

द्विषन्तः परकायेषु स्वात्मानं हरिमीश्वरम्
मृतके सानुबन्धेऽस्मिन्बद्ध स्नेहाः पतन्त्यधः ॥ १५ ॥

परमात्मा जो श्रीहरी । तो अंतर्यामी सर्व शरीरीं । तेथ पराचा जो द्वेषु करी । तेणें द्वेषिला हरि निजात्मा ॥८१॥ परासी जो करी अपघातु तेणें केला निजात्म घातु । त्यासी सकुटुंब अधः पातु । रौरवांतु ते बुडती ॥ ८२ ॥

× × × ×

सूर्योग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खंमरुज्जलम्
भूरात्मा सर्व भूतानि भद्रपूजापदानि मे ॥ ४२

एकादशीं एकादशाध्यायीं । एकादशपूजास्थानें पाही । एकाजना-र्दनु तें ही । एकरूप सर्वही वर्णील ॥ ४३ ॥

या श्लोकांतील भगवंताच्या पूजेचें अधिष्ठान जी 'गोमाता' तिच्या पूजनाविषयीं श्री एकनाथ महाराज लिहितातः–

जे गायीच्या कैवारा । घायें सहस्रावाहो केला पुरा । तीन सप्तकें वसुंधरा । मुख्य धुरा म्यां मारिल्या ॥ ८७ ॥ रामावतारीं अतिमाहिमान । तैं न घडेचि गोशुश्रूषण । या लागीं गोकुळीं जाण । गायींचें सेवन म्यां केलें ॥ ८८ ॥ गायीचे सेवे झाली पुष्टी । बाळपणीं मारिले जेठी । कंस चाणूर मारिले हटी । बैसविला राज्य-पटीं उग्रसेन ॥ ८९ ॥ गायीचे सेवेची अतिगोडी तेणें माझी कीर्ति झाली चोखडी । फोडिली कंसाची बांदवडी । तोडिली बेडी पितरांची ॥ ९० ॥ यालागीं गाई आणि ब्राह्मण । माझा जाण जीव प्राण । माझें पूजेचें अधिष्ठान । सुलभ जाण इयें दोन्ही ॥ ९१ ॥ आपत्काळीं गोरक्षण करी तो मज पढियंता जाण । त्यासवें मी आपण गोरक्षण करीतसें ॥ ९२ ॥ गायीचें सेवेचें विधान । गोग्रास द्यावा जे तृण । करावें अंगकुरवाळण । इतुकेन प्रसन्न मी होय ॥ ९३ ॥ निर्लोभ गायीची सेवा । करितां माझी प्राप्ति उद्धवा । ऐक वैष्णवाची सेवा । पूजा सद्भावा विभागू ॥ ९४ ॥

नाथभागवत अध्याय ११ वा.

## क्षत्रियांचा धर्म.

श्रीनाथ महाराज लिहितातः-

वेंचूनियां निजप्राण । गोब्रह्मणांचें संरक्षण । स्वधर्म प्रजापालन । पृथ्वी रक्षण निरुपद्रवें ॥ ६१ ॥ गोब्रह्मण संरक्षणता । स्वधर्मे प्रजापाळकता । ये ठायीं उबगू नये चित्ता । या नांव स्थिरता क्षत्रियांची ॥ ६२ ॥

## शूद्रांचा सेवक धर्म कोणता ?

करावें गृहस्थाचें गोरक्षण । चाराव्या जेथें तृण जीवन । श्वापद भय आलिया जाण । वेंचूनि प्राण रक्षाव्या ॥ ८८ ॥ गोरक्षणी वेंचिल्या प्राण । त्यासी उत्तम गति जाहली जाण । ज्यासी गाईचा कळवळा गहन । त्यासी मी श्रीकृष्ण सदा साह्य ॥ ८९ ॥

ब्रह्मचाऱ्याचें कर्तव्य नाथांनीं सांगितलें आहे तें असेंः—

गायत्री दात्या आचार्यपण । माता पिता तें गुरुस्थान । अग्नि सूर्यादि सुरगण । गोब्राह्मण आणि ज्येष्ठ ॥ ९१ ॥ त्यांचें करावया उपासन । ब्राह्मशुची अंतरीं समाधान । गुरुचरणीं अनन्य शरण । आज्ञा पालन पितयाचें ॥ ९२ ॥ जेष्ठांसी साष्टांग नमन । गाईसी अंग कुरवाळण । सायंप्रातःसंध्येसी मौन मध्यान्हीं जाण मौन नाहीं ॥ ९३ ॥

———

# श्री तुकाराम महाराज.

१

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न शिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥ सत्य-वादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥ घडे ज्या उपकार भूतांचि ते दया । आत्मस्थिती तया आंगिं वसे ॥ ३ ॥ न बोले गुणदोष नायके जो कानीं । वर्तोनि तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥ तुका ह्मणे वर्म जाणितल्या-विण । पावे करितां शीण सांडी मांडी ॥ ५ ॥

२

जे कां रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुलें ॥ १ ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥ तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ ६ ॥

३

देवाची पूजा हे भूतांचें पाळण । मत्सर तो शीण बहुतांचा ॥ १ ॥ रुसावें फुगावें आपुलिया वरी । उरला तो हरी सकळही ॥ २ ॥ तुका म्हणे संतपण याचि नांवें । जरि होय जीव सकळाचा ॥ ३ ॥

४

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणें शिवो कैसें लोखंडासी

॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥४॥ तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥

५

पाहा हो कलीचें महिमान । असत्यासि रिझले जन । पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥ १ ॥ ऐसें अधर्माचें बळ । लोक ठकविले सकळ । केलें धर्माचें निर्मूळ । प्रळय काळ आरंभला ॥ २ ॥ थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्म कर्म उत्तम सार । सांडुनियां द्विजवर । दावल पीर स्मरताती ॥ ३ ॥ ऐसे यथार्थचि अनर्थ । झाला बुडाला परमार्थ । नाहीं झाली ऐसी नीत । अहा भूत पातकें ॥ ४ ॥ शांति क्षमा दया । भाव भक्ति सत्क्रिया । ठाव नाहीं सांगावया । सत्व धैर्य भंगलें ॥ ५ ॥ राहिले वर्णाश्रम धर्म । अन्योन्य विचरती कर्म । म्हणविती राम-राम । श्रम महा मानिती ॥ ६ ॥ वेर भोरपाचे शिरीं । धांवतीं भूतें अमिषा जैसीं । कथा पुराण म्हणतां सिसी । तिडिक उठी नकऱ्याचें ॥ ७ ॥ विषय लोभासाठीं । सर्वांवैसी प्राण साटी । परमार्थीं पीठ मुठी । मागतां उठतीं सुनींसीं ॥ ८ ॥ धनाढ्य देखोनि अनामिक । तयास मानिती आवश्यक । अपमानिले वेद पाठक । सात्विक शाकाक्त संपन्न ॥ ९ ॥ पुत्र ते पितया पाशीं । सेवा घेती सेवका ऐसीं । सुनांचिया दासी । सासा झाल्या आंदण्या ॥ १० ॥ थोरें सांडें आली निवसी । केली मर्यादा

नाहीसी । भार्या भ्रतारासी । रंक तैसीं मानिती ॥ ११ ॥ नम-स्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा । पोटा साठीं खोसा वंदिती मलिंच्छांच्या ॥ १२ ॥ बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न म्हणती चांडाळ । अभक्ष्य भक्षिती विटाळ । कोणी न धरी कोणाचा ॥ १३ ॥ कैसें झालें नष्ट वर्तमान । एकादशीस खातीं अन्न । विडे घेऊन ब्राम्हण । अविंद वाणी वदतातीं ॥ १४ ॥ कामिनी पिटंबिल्या कुळवंती । वदनें दासीची चुंबिती । सोवळयाच्या स्फीती । धर्मी मिरवती पवित्रता ॥ १५ ॥ मद्यपानाची धुरांणी । नवनिता न पुसे कोणी । केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रतों ॥ १६ ॥ केवळी दोषाची सबळता । झाली पाहाहो भगवंता । पुण्य बुडावोनी संतां । तीर्थी हरी आजिळी ॥ १७ ॥ मेघें मंद झाली मेघ वृष्टी । आकांतली कापे सृष्टी । देव रिगाले कपाटी । आटीं औटी प्रवर्तली ॥ १८ ॥ अधिक धान्ये दिवसें दिवसें । गाई म्हशी चेवल्या गोरसें । नगरें दिसतातीं उध्वंसें । विकलीं बहुवसें पाखांडे ॥ १९ ॥ होम हारपळी हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें । जप तपादि साधनें । आचरणें अटलीं ॥ २० ॥ अठरा यातींचा व्यापार । करिती तस्कराई विप्र । सांडोनिया शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ॥ २१ ॥ गेला लोपलीं गायत्री । मरके चमत्कार मंत्रीं । भ्रष्टाचिये घरी । कुमारी विकिती वेदवक्ते ॥ २२ ॥ वेदाध्ययन संहिता ऋचि । चकांचा करिती तयांची । आवडी पंडितांची । मुसाफावरी बैसली ॥ २३ ॥ मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदून केलीं दीनें । कुठी कांपंतों

माहा मौन्यें मिरविताती दुर्जनें ॥ २४ ॥ कळा कुशळता चतुराई। तर्क वादी भेद निंदे ठायीं। विधी निषेधांच्या वाही। एकहि ऐशी नाडली ॥ २५ ॥ संन्यासी तापशी ब्रह्मचारी। होतां दिगंबर निस्पृही वैराग्यकारी। कामक्रोधे व्यापिले भारी। इच्छे करी न सुटती ॥ २६ ॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक। राजे झाले प्रजांसी अंतक। पिते पुत्र सहोदर एकाएक। शत्रुघातें वर्तती ॥ २७ ॥ केवढी ये रांडेची अंगवण। भ्रमविलें अवघे जन। याती अठरा चारी वर्ण। कर्दम करोनि विटाळिले ॥ २८ ॥ पूर्वी होतें भविष्य केलें। सर्वी तें यथार्थ झालें। ऐकत होतो तें देखिलें। प्रत्यक्ष लोचनीं ॥ २९ ॥ आतां असो हें आघवे। मति नव्हे कळी मध्यें वावरावें। देवासी भाकोनि करुणारवें। वेगें स्मरावें अंतरीं ॥ ३० ॥ आगा ये वैकुंठ नायका। काय पाहातोसि या कौतुका। धांव कलीनें गांजिले लोकां। देतो हांका सेवक तुकयाचा ॥ ३१ ॥

६

पापाचिया मुळें। झालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥ दोष झाले बळिवंत। नाहीं ऐशी झाली नीत ॥ २ ॥ मेघ पडों भीती। पिक सांडियली क्षिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं। वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥

७

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥ उत्तमाचि गति तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥ परउपकारी नेणें परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी

3952

माया ॥ ३॥ भूतदया गाई पशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥ शांतीरूपें नव्हें कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥ तुका म्हणें हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

८

सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । काढितो ठोंबरा संतालागीं ॥ १ ॥ गाईसी देखुनि बदाबदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ २ ॥ पान फुल नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ ३ ॥ पर्वकाळीं धर्म न करी जासरी । वेंचो राजद्वारीं उदंडचि ॥ ४ ॥ कीर्तना जावया होतसे हिंपुटी । खेळतो सोंगटी रात्रंदिवस ॥ ५ ॥ बाइलेच्या गोतां आवडीनें पोशी । मातापितयासी दवडितो ॥ ६ ॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ७ ॥

९

देवाचिया वस्त्रा स्वप्नीही नाठवी।स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥१॥ गाईचें पाळण नयेचि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥ २ ॥ ढेंकराची रास स्वयें धांवें क्षाळूं । न म्हणें प्रक्षाळूं द्विजपाया ॥३॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥

१०

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातीसीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥ जे जैसे करीती ते तैसे पावती । भोग ते

माहा मौन्यें मिरविताती दुर्जनें ॥ २४ ॥ कळा कुशळता चतुराई । तर्क वादी भेद निंदे ठायीं । विधी निषेधांचिया वाही । एकहि ऐशी नाडली ॥ २५ ॥ संन्यासी तापशी ब्रह्मचारी । होतां दिगांबर निस्पृहीं वैराग्यकारी । कामक्रोधे व्यापिले भारी । इच्छे करी न सुटती ॥ २६ ॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक । राजे झाले प्रजांचे अंतक । पिते पुत्र सहोदर एकाएक । शत्रुघातें वर्तती ॥ २७ ॥ केवढी ये रांडेची भंगवण । भ्रमविलें अवघे जन । याती अठरा चारी वर्ण । कर्दम करोनि विटाळिले ॥ २८ ॥ पूर्वी होतें भविष्य केलें । संतीं तें यथार्थ झालें । ऐकत होतो तें देखिलें । प्रत्यक्ष लोचनीं ॥ २९ ॥ आतां असो हें आघवे । मति नव्हे कळीमध्यें वावरावें । देवासी भाकोनि करुणारवें । वेगें स्मरावें अंतरीं ॥ ३० ॥ आगा ये वैकुंठ नायका । काय पाहातोसि या कौतुका । धांव कलीनें गांजिले लोकां । देतो हांका सेवक तुकयाचा ॥ ३१ ॥

६

पापाचिया मुळें । झालें धर्माचें बाटोळें ॥ १ ॥ दोष झाले बळिवंत । नाहीं ऐशी झाली नीत ॥ २ ॥ मेघ पडों भीती । पिकें सांडियली क्षिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥

७

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥ उत्तमाचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणीं ॥ २ ॥ परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी

3752

माया ॥ ३॥ भूतदया गाई पशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥ शांतीरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥ तुका म्हणें हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

८

सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । काढितो डोंबरा संताळागीं ॥ १ ॥ गाईसी देखुनि बदाबदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ २ ॥ पान फुल नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ ३ ॥ पर्वकाळीं धर्म न करी जासरी । वेंची राजद्वारीं उदंडचि ॥ ४ ॥ कीर्तना जावया होतसे हिंपुटी । खेळतो सोंगटी रात्रंदिवस ॥ ५ ॥ बाइलेच्या गोतां आवडीनें पोशी । मातापितरांसी दवडितो ॥ ६ ॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ७ ॥

९

देवाचिया वस्त्रा स्वप्नीही नाठवी। स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥ १॥ गाईचें पाळण नयेचि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥ २ ॥ ढेंकराची रास स्वयें आंवें क्षाळूं । न म्हणे प्रक्षाळूं द्विजपाया ॥ ३॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥

१०

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातीशीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥ जे जैसे करीती ते तैसें पावती । भोग ते

भोगिती केले कर्मी ॥ ३ ॥ आशा बद्ध करूं नये तें करिती । तुका ह्मणे जाती नरका मधीं ॥ ४ ॥

११

गाइत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गती यम लोकीं ॥ १ ॥ कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरक पाता ॥ २ ॥ नाम गाऊनिया द्रव्य जे मागती । नेणो तयां गती कैसी होय ॥ ३ ॥ कैसें होय त्यांचें तेंच हो जाणती । आम्हांसी संगती नलगे त्यांची ॥ ४ ॥ आमुचा सांगाती आहे तो श्रीहरी । नलगे दुराचारी तुका म्हणें ॥ ५ ॥

१२

जातीची शिंदळीं । तिला कोण वंशावळी ॥ १ ॥ आप-खर ना बापखर । चित्तीं मनीं व्यभिचार ॥ २ ॥ सेजे असोनियां धणी । परद्वार मनीं आणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे असल जाती । जाती साठीं खाती माती ॥ ४ ॥

१३

धिग् तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रसवली ॥ १ ॥ कठीण हृदय तया चांडाळाचे । जो नेणें पराचे दुःख कांहीं ॥ २ ॥ आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुखें कापीतसे गळे । आपुल्या वेळे रडतसे ॥ ४ ॥

१४

आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥ यातिकुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असें

अंगीं ॥ २ ॥ काळकूळ पितळ सोने शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्षी देते ॥ ३ ॥ तुका ह्मणे वरी जाती सर्वं भेटी । नवनीत पोटीं सांठविले ॥ ४ ॥

१५

दोराच्या आधारें पर्वत चढला । पाऊलासाठीं केला अपघात ॥ १ ॥ अष्टोत्तरशें व्याधि ज्या वैद्ये दवडूनि । तो वैद्य मारूनि उत्तीर्ण झाला ॥ नवमास माया वहिले उदरीं । ते माता चौबारीं नग्न केली ॥ ३ ॥ गायत्रींचें क्षीर पिळून घेऊनि । उरवासी बांधोनी ताडन करी । तुका ह्मणे दासां निंदी त्याचें तोंड । पाहतां नर्ककुंड पूर्वजाशीं ॥ ५ ॥

१६

आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ॥ १ ॥ करितो बैठे उसनवारी । यमपुरीं भोगावया ॥ २ ॥ सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाचतीं पोरें । खोडितां येरें अंग दुःखे ॥ ४ ॥

१७

मांस खातां हौस करी । जोडूनि वैरी ठेवियेला ॥ १ ॥ कोण त्याची करील कींव । जीवें जीव नेणतीं ॥ २ ॥ पुढिलांसाठीं पाजळी सुरी । आपुली चोरी अंगुळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुटिती हाडें । आपुल्या नाडें रडतील ॥ ४ ॥

१८

जीवें जीव नेणें पापी सारिखाची । नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥ आत्मा नारायण सर्वांघटीं आहे । पशूमध्यें काय

कळों नेथ ॥ २ ॥ देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात । वाहती कैसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक माहा दुःखें ॥ ४ ॥

१९

कांहीं दुसरा विचार । नलगे करावाचि फार ॥ १ ॥ सेव्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥ २ ॥ पाप नलगे धुंडावें । पाहिजे तरी तेथें जावें ॥ ३ ॥ जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥ ४ ॥ गाई ह्मशी हेड । तूप विकी महाद्वाड ॥ ५ ॥ तुका म्हणे पाहीं । तेथें पुण्यां रीघ नाहीं ॥ ६ ॥

२०

अभक्ताचे गांवीं साधु म्हणजे काय । व्याघ्रवाडा गाय सांपडली ॥ १ ॥ कसाबाचे आळीं मांडिलें प्रमाण । वस्वणाची आण तया कायी ॥ २ ॥ केळी आणि बोरी असती शेजारीं । संवाद कोणेपरी घडे तेथें ॥ ३ ॥ तुका म्हणे खीर केली कान्हे-ळ्याची । शुद्ध गोडी कैची वसे तेथें ॥ ४ ॥

२१

ऐका संतजन उत्तरें माझीं बोबडे बोल । करी लाड तुम्हां-पुढें हो कोणी ह्मणी कोपाल ॥ १ ॥ उपाय साधन आइका कोण गति अवगति । हद्ध बैसोनी सादर तुम्ही धरावें चित्तीं ॥ २ ॥ धर्म तयासी घडेरे ज्याचे स्वाधीन भाज । कर्म तयासी जोडे भीत नाहीं लाज ॥ ३ ॥ पुण्य तें जाणारे भाईनों परोपकाराचे । पर-पीडा परनिंदा खरे पाप तयाचें ॥ ४ ॥ लाभ तयासी जाला रे

मुखी देव उच्चारी । प्रपंचापाठीं गुंतलारे हाती तयासीच थोरी ॥ ५ ॥ सुख तें जाणा रे भाइनो संत समागम दुःखतें जाणारे भाईनों सम तेथें विषम ॥ ६ ॥ साधन तयासी साधेरे ज्याची स्वाधीन बुद्धी । पराधिनासी आहे घात रे थोर जाण संबंधी ॥ ७ ॥ मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे । अपमानी तो अधर रसस्वाद चाखे ॥ ८ ॥ जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान । नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ॥ ९ ॥ भला एक तो जाणरे गयावर्जन करी । बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥ १० ॥ आचारी अन्न काढीरे गाई अतितभाग । अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥ ११ ॥ स्वहित तेणेंचि केलेरे मूर्ती देखिला देव । अनहित तयाचे झालेरे आणि अहंभाव ॥ १२ ॥ धन्य जन्मा तेचि आले रे एक हरीचे दास । धिगते विषयीं गुंतले केला आयुष्याचा नाश ॥ १३ ॥ जो हरी तोचि एक जाणारे जाणे सिद्ध लक्षणें । वेडसरू तो भुलेरे वरदळ भूषणें ॥ १४ ॥ बाळिगादा तोचि जाणारे भक्ति दृढशारीरीं । गांव्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥ १५ ॥ खोल तो वचन गुरूचें जो गिळूनि बैसे । उथळ धीर नाहीं आंगींरे म्हणे होइल कैसे ॥ १६ ॥ उद्धार तोचि जीवभावरे ठेवी देवाचे पायीं । कृपण तयासी बोलिजे पडे उपाधि डाई ॥ १७ ॥ चांगलें पण तेचिरे ज्याचें अंतर शुद्ध । ओंगळ मळीण अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥ १८ ॥ गोड तेंचि एक आहेरे सार विठ्ठल नाम । कडु तो संसार रे लक्ष चौऱ्यांशी जन्म ॥ १९ ॥ तुका

ह्मणे मना धरीरे संतसंगती सोई । नलगे कांहीं करावे राहे विठ्ठल पायीं ॥ २० ॥

२२

मारूं नये-सर्प संतांचिये दृष्टीं । होतील ते कष्टी व्यापकपणें ॥ १ ॥ एक सूत्र जीव शिवी आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥ २ ॥ नाहीं साहों येत दुखाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य झाले ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिला नीतीचा संकेत । पुजा नांवें चित्त सुखी तेणें ॥ ४ ॥

२३

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकाचे ॥ १ ॥ पाप त्याचे नांव न विचारी नीत । मळतेची उन्मत्त करी सदा ॥ २ ॥ धर्म नीतीचा ह्या एक वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

२४

स्वामिकाज गुरुभक्ति । पितृ वचन सेवापति ॥ १ ॥ हेचि विष्णूची महापूजा । अनुभव नाही दुजा ॥ २ ॥ सत्य बोले मुखें । दुःखें आणिकाच्या दुःखें ॥ ३ ॥ निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंचि फळ ॥ ४ ॥

२५

आजि ओस.अमरावती । काय पाहावया येती । देव विसरती । देहभाव आपुला ॥ १ ॥ आनंद न समाये मेदिनी चारा विसरल्या पाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई जाल्या श्वापदें ॥ जे या देवाचें दैवत । उभें आहे या रंगांत । गोपा-

ळासहित । क्रीडा करी कान्होंबा ।। ३ ।। तया सुखाची शिराणी । तींच पाऊलें मेदिनी । तुका ह्मणे मुनी । धुंडितां न लभती ।। ४ ।।

२६

झालें रामराज्य काय उणे अम्हांसी । घरणी धरी पिकें गाई वोळल्या म्हैशी ।। १ ।। राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओंविये । दळितां कांडितां जेवितां गे बाईये ।। २ ।। स्वप्नींही दुःख कोणीं न देखे डोळा । नामाच्या गजरें भय सुटलें काळिकाळा ।। ३ ।। तुका म्हणें रामें सुख दिधलें आपुलें । तया गर्भवासां येणें जाणें खुटलें ।। ४ ।।

२७

अवघीं भुतें साम्या आलीं । कैं देखिलीं म्यां होतीं ।। १ ।। विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ।। २ ।। माझी कोणी न धरो शंका । विश्व हो का निर्द्वंद्व । तुका म्हणे जे जे भेटे । तें तें वाटे मी ऐसें ।। ३ ।।

२८

ॐतत्सदिति सूत्राचें सार । कृपेचा सागर पांडुरंग ।। १ ।। हरिः ॐसहित उदित अनुदित । प्रचुरिंश्वरासहित पांडुरंग ।। २ ।। गोब्राह्मण हिता होऊनी निराळें । वेदाचें तें मूळ तुका ह्मणे ।। ३ ।।

---

# श्रीसमर्थ रामदास.

देव-धर्म-गो-ब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥

निष्ठुरपण धरूं नये । जीव हत्याकरूं नये ॥

-दा. द. २-२-३७

आत्म हत्यारा स्त्री हत्यारा । गोहत्यारा ब्रह्म हत्यारा । मातृहत्यारा पितृहत्यारा । महापापी पतीत २-३-२१

दुसऱ्याचा प्राण घ्यावा । आपला आपण स्वयें द्यावा । विसरवी जीव भावा । तो तमोगुण ॥ २-६-४ ॥

स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्महत्या । करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ॥ २-६--१२ ॥

किडा मुंगी आणी स्वापद । याचा करूं आवडे वध । अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ॥ २-६-७७ ॥

अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें । नाना रत्नांचीं करी दान । तो सत्वगुण ॥ २-७-१५ ॥

शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया । सत्वगुण जाणावा तया अंतरीं आला ॥ २–७–६२ ॥

सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव । परोपकारीं वेंची जीव । तो सत्वगुण ॥ २–७–६४ ॥

परस्त्रीसी कलह करी । मुकीवस्तु निघातें मारी ।
मूर्खाची संगति धरी । तो एक मूर्ख ॥ २-७-६६

इति महानुभाव गाइत्री पूजन । या नांव पांचवी भक्ति ॥
४–५–४

नाना देवांच्या नाना प्रतिमा । लोक पूजिती धरूनि प्रेमा । ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा कैसा आहे ॥ ११–९–६

ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे ॥ ११-९-७

शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यांवें । उणें पडो नेदावें । कोणियेकाचें ॥ १२–१०–५

दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । पर संतोषें सुखी व्हावें । प्राणीमात्रांस मेळवून घ्यावें बऱ्या शब्दें ॥ १२–१०–७

आपुल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ १२–१०–२७

देव वर्ततो जगतांतरीं । तोचि आपुलें अंतरीं । त्रैलोकींचे प्राणी मात्रीं । बरें पहा ॥ १४–८–८

देहासि बरें करावें तें । आत्मयांस पावे ॥ १४–८–१९

नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी । या कारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥ १६–९–२९

देव पाहावया कारणें । देउळें लागतीं पाहणें । कोठें तरी देउळाच्या गुणें । देव प्रगटे ॥ १७–१–१२

देउळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें ॥ १७–१–१३

चालतीं बोलतीं देउळें । त्यांमध्यें राहिजे राउळें । जितुकीं देउळें तितुकें सकळें कळलीं पाहिजे १७–१–१४

पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें । नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ॥ २०–४–४

---

## मुक्तेश्वर.

चतुराननें निर्मिली क्षिती । चारी खाणी वर्तती भूतीं कामधेनू शक्रामती । जाऊनि करी शोकातें ॥ ११९ ॥ माझे पुत्र वृषभ सकळ । कष्ट भोगिती सर्वकाळ । दुःख देखोनी तळमळ । मन अपार वाटतसे ॥ १२० ॥ नांगर शकट रथ मोगिया । धान्य मळणीं तेल घाणिया । पाठीं बहुभार वाहोनियां । अहोरात्र शिणती ॥ १२१ ॥ दगड माती काष्ठ भार । सदां मारिती निष्ठुर । गाळीप्रदानें अपार । कष्ट करिती ओपिती ॥ १२२ ॥ शीत उष्ण पर्जन्यवात । निराश्रयें सर्व साहत । भूके तृणोदक भेदित । उपेक्षिती निर्दय ॥ १२३ ॥ वत्सें बंधनीं तळमळतीं । सुकल्या आक्रोश बोभातीं । धेनुकांसेहुनि ओढिती । पय प्राशितां मातेचें ॥ १२४ ॥ मेल्यां ओपिती अनामिकां । त्वचेच्या करिती

दोर पादुका । ऐसें कर्म सुरनायका ! । किमर्थ त्यांतें निर्मिलें ? ॥ १२५ ॥ शक्तीनें खांदीं पाठी बसतें । वोढुनि नेती बहु भारातें । आक्रोशें पावती कष्टातें । तें दुःख वातें अपार ॥ १२६ ॥ ऐसे नानापरिचे क्लेश । पुत्र भोगिती बहुवस । ऐकोनि इंद्र करी हास्य । ह्मणे 'परीस पवित्रे' ॥ १२७ ॥ 'तुझे पुत्र असंख्यात । सुखी बहुत दुःखी बहुत । स्वल्प पुत्रांलागीं चित्त । व्याकुळ करणें कासया ?' ॥ १२८ ॥ 'दीन दुर्बळ त्यागूनि सृष्टी । सुखिये सभाग्य पाहूनि दृष्टी । तुवां असावें सुख संतुष्टी । खेद पोटीं न मानावा' ॥ १२९ ॥ येरी ह्मणे जी 'निर्धारीं । समान स्नेह सकळां वरी । मातृस्नेहामीतरीं भेदभावना असेना ॥ १३० ॥ त्यांमाजीं सात्विकें भाग्यहीनें । जें जें दुःख भोगितीं दारुणें । त्यालागिं मातेचेनि मनें । खेद अपार पाविजे ॥ १३१ ॥ स्वेच्छ भक्षुनी मातले क्षिती । काममदें बोकाळती । दुर्बळ देखोनि बडविती कुंफाटती परद्वेषें ॥ १३२ ॥ तयां वेदाज्ञा वेसणी । विहिताचार दावणी । बांधोनि बडावे हे वाणी । ब्रह्मयाची जाणपां ॥ १३३ ॥ दीनें दुर्बळें अशक्तें । तऱ्ही पाविजे दुःखातें । परम खेद वाटे मातें । जाण निश्चितें सुरेशा, ॥ १३४ ॥ तोषोनि बोले अमर पाळ । 'करिती वृषभांचा सांभाळ । तयासी सुखाचा सुकाळ । मी चिरकाळ भोगवी ॥ १३५ ॥ पुत्रांतुल्य पशूतें पाळी । त्यालागीं मेघ इच्छिले काळीं । पाहूनि पिकवी महीतळीं । तृणधान्य सर्वदा ॥ १३६ ॥ करिती वृषभांचें पीडन । त्यांचिये पाहूनी आपमान । शेती न पिके तृणधान्य ।

नासे प्राण दुर्भिक्षीं ॥ १३७ ॥ स्वचक्र परचक्र टोळ मूषक । चिकट तांबरा आाळिक । दुग्धश्रवादि अनेक । रोग उठती वान्यातें ॥ १३८ ॥ कष्ट घेउनी सदाकाळ । न करिती वृषभाचा सांभाळ । त्या दोषांचें हें फळ । मी भोगवी तयांतें ॥ १३९ ॥ वत्सा अभ्यास नाहीं तृणीं । क्षुधित ओढिती कासेहुनी । तेणें दोषें मी क्षोभोनी । क्षय करी वंशाचा ॥ १४० ॥ धेनु म्हणे ' स्वामी एक । सकळा देई सारखें सुख ! । संतोषोनी सुरनायक शांतविलें वरदहस्तें ॥ १४१ ॥

—महाभारत वनपर्व अ. १ ला.

———

# :–गोपीगीत:–

( भागवत १०–३१ )

वंदूनियां सद्गुरु पादुकांसी । प्रणम्य भावें मग सज्जनांसी ।
श्रीकृष्ण नामेंचि कैवल्य मुक्ति । गोविंद दामोदर माधवेति ॥ १ ॥
प्रभातकाळीं जननी यशोदा । 'उठीं' ह्मणे 'सत्वर, बा मुकुंदा ।
गोपाळ येती तुजला बहाती ॥ गोविंद० .... ॥ २ ॥
प्रकाश केला गगनीं रवीनें । गोपी दधी त्या घुसळी रवीनें ।
त्या कंकणांचे बहु नाद येती । गोविंद० .... ॥ ३ ॥
प्रक्षाळुनीयां मुख खाय रोटी । लोणी असे सुंदर तूजसाठीं ।
अशी कशीरे तुज झोप येती । गोविंद० .... ॥ ४ ॥
वृंदावना लागुनि जाय बाळा । उशीर माझ्या दळणासि झाला ।
जेवूनियां गोप घरासि येती । गोविंद० .... ॥ ५ ॥
जाई त्वरेनें सखया ! वनातें । मागून मी धाडिन भोजनातें ।
गोपाळ हे सर्व तुला बहाती । गोविंद० ... ॥ ६ ॥
करांबुजीं घेउनियां शुकाला । अभ्यास गोपी करिती तयाला ।
रागस्वरें सुंदर बोलवीती । गोविंद० .... ॥ ७ ॥
गो दोहना बैसति गोपदारा । पात्रांतरीं वाजति क्षीर धारा ।
तेणें स्वरें मंजुळ गीत गाती । गोविंद० .... ॥ ८ ॥
गाई वनावांचुनि दीन जाल्या । घरीं नसेरे तृण त्या भुकेल्या ।
दावीं नवीं तोडुनि धांव घेती । गोविंद० ....॥ ९ ॥
घेवोनि जातें दळु गोधुमातें । घर्मार्थबिंदू मुख पंकजातें ।
सुवक्र केशा हरिगूण गाती । गोविंद० .... ॥ १० ॥

कूपांतरीं घालुनि भांडदोरा । शोभतसे सुंदर गोपदास ।
ओढोनि हस्तें श्रम फार होती । गोविंद०.... ॥ ११ ॥
उखळ खलीं घालुनि तंदुळांतें । गोपांगना कांडिती रम्य हस्तें ।
आलापुनी सुंदर गीत गाती । गोविंद०.... ॥ १२ ॥
[illegible] सारिति गोपबाळी । लाटीतसे सुंदर पूर्ण पोळी ।
घोषाणेवें कंकण ढाळ घेती । गोविंद०.... ॥ १३ ॥
[illegible] घेउनियां शिदोरी । नेऊनि देती सखया मुरारी ।
'घे स्वामिया ! श्रीपति ताट हातीं । गोविंद०.... ॥ १४ ॥
'गाइस चारा यमुनेसि पाणी । वळती करावी अजि तुम्हि कोणी ।
कृष्णासि माझ्या बहु श्रम होती । गोविंद०.... ॥ १५ ॥
करी अती सुंदर मोहरीया । पावा बहू वाजत थाक थय्या ।
ते घोंगडीया कसे उडवीती । गोविंद ०... ॥ १६ ॥
यादव हरी लागुनि लुब्ध कैसे । जळांत हे मत्स्य सदैव तैसे ।
समर्थ कैसे हरिगूण गाती । गोविंद ०.... ॥ १७ ॥
गोविंद गोपाळ हे दोघ बंधु । जेवीत होते दहिभात लिंबू ।
त्या भोजनाची रुचि फार येती । गोविंद०.... ॥ १८ ॥
गोविंद गोविंद हरे मुरारे । गोविंद गोविंद रथांगपाणे ।
गोविंद गोविंद मुकुंद मूर्ती । गोविंद०.... ॥ १९ ॥
[illegible]दावनी सुंदर वृक्ष आहे । श्रीकृष्ण नामें ध्वनि गर्जताहे ।
पक्षीकुळें यादव गीत गाती । गोविंद ०.... ॥ २० ॥
'श्रीकृष्ण श्रीकृष्ण' मुखारविंदें । घेवोनियां नाचति नाम छंदे ।
[illegible]ोनि गाई बहु कान देती । गोविंद०... ॥ २१ ॥

—अनंतकवि ( समर्थ शिष्य )

# कविवर्य मोरोपंत.

सुशर्मा शरण आल्यानंतर धर्मराजांनीं त्यास धेनु महात्म्याविषयीं उपदेश केला—

नमन पुरे रे ! जारे ! ध्याव्या गाव्या दिसोत गाईशा ॥
शिवमूर्ति किरे ! यांचें लंघन सोसेल काय गा ! ईशा ॥ १ ॥

रे सुशर्म्या ! बाहेरून गाईसारख्या दिसल्या तरी गाई ह्या प्रत्यक्ष शिवाच्या मूर्ति होत ! त्यांचें लंघन (छळ) परमेश्वराला कधींतरी सहन होईल काय ?

वि. प. अ. ३–६४

उत्तर गोग्रहणप्रसंगीं गोपाध्यक्ष नगरांत येऊन 'उत्तराला' सांगतो—

गोधन षष्टि सहस्र व्रज ओस करूनि, नेतसे कुटिल।
कुटिल प्रजाहि, जो गोपीडक तो ब्राह्मणां न कां कुटिल? ॥ ५ ॥
कवची, धन्वी, खड्गी, ऱ्हा चित्तीं रामचंद्रहि असा ध्यात।
बैसा रथीं जयश्री गोविप्रावनपरासि न असाध्या ॥ ६ ॥

वि. प. अ. ३

गोब्राह्मणांचें रक्षण करण्यांत तत्पर असलल्यास जयश्री प्राप्त होणें अशक्य नाहीं, हा पंतांचा सिद्धांत मनन करण्याजोगा आहे.

राजकुमारी उत्तरा बृहन्नला वेषधारी अर्जुनाला म्हणते—

गोधनषष्टिसहस्र स्वपुरा नेताति हरुनि कौरव हो ॥
गौरव हो न बुधजनीं । त्या मेल्यांला अनंत रौरव हो ॥

त्यांवरि जातो उत्तर, त्याचें सारथ्य ये करायास ॥
सुखद इहामुत्रहि गोविप्रत्राणोत्थ जे करायास ॥

वि. प. अ. ३

गाई हरण करणाऱ्या या मेल्या कौरवांना नरकवास प्राप्त होवो-बृहन्नले, त्या कौरवांशीं लढण्याकरितां उत्तर निघाला आहे, त्याचें तू सारथ्य कर. गाय आणि ब्राह्मण यांचें रक्षण करण्याचेकामीं होणारे हाताचें श्रम ( कर आयास ) इहपर लोंकीं देखील सुखदायक होतात.

बहुपन असो नसो परि गृही असावेंच एक तें दुभतें ॥

---

## गोस्वामी तुलसीदास.

श्रीशंकर पार्वतीदेवीला रामावताराचें कारण निवेदन करतात—

जब जब होई धरमके हानी । बाढहिं असुर अधम अभिमानी । करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी ॥ तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ॥

जेव्हां जेव्हां ह्मणून धर्माचीं ग्लानी होते, दुष्ट व उन्मत्त राक्षस यांचा उदय होऊन ते अनिर्वाच्य प्रकार करून नीतिबाह्य वर्तन करूं लागतात, आणि **ब्राह्मण, गाई, देव व पृथ्वी** हीं संत्रस्त होतात. तेव्हां तेव्हां दयासागर प्रभु नानाविध शरीरें धारण करून सज्जनांची पीडा हरण करितात.

\+ × × +

श्रीराम प्रभु अवतरण्यापूर्वी रावणाच्या आज्ञेवरून राक्षस समुहानें कसा धुडगूस आरंभिला होता तो पहा—

**जेहि विधि होइ धरम निर्मूला। सो सब करहिं वेद प्रतिकूला। जेहि जेहि देस धेनु व्दिज पावहिं। नगर गाउं पुर आगि लगावहीं।**

जेणेंकरून धर्म निर्मूलन होईल, असे सर्व वेदबाह्य प्रकार ते करीत सुटले. ज्या ज्या प्रदेशांत त्यांना गाई व ब्राह्मण आढळत तें तें नगर, ग्राम, पूर त्यांनीं जाळून फस्त करावें. !

**बिप्र-धेनु-सुर-संत-हित लीन्ह मनुज अवतार। निज-इच्छा-निर्मित -तनु माया-गुन-गो-पार॥**

मायागुण व इंद्रियातीत **प्रभूनें स्वेच्छेनें ब्राह्मण, गाई, देव व संत यांच्या कल्याणास्तव** मनुष्यावतार धारण केला.

+ + + ×

क्षत्रिय वेषधारी परशुराम भृगु कुलांतील आहेत, असें पाहतांच प्रभु रामचंद्रजींचा सर्व राग शांत जाहला आणि ते ह्मणाले—

सुर महिसुर हरिजन अरुगाई।
हमरे कुल इन्ह पर न सुराई॥

बधे पाप अपकीरति हारे। मारतहू पापरिय तुम्हारे।

देवता, ब्राह्मण, संत आणि गाई यांच्यावर **शौर्य गाजविण्याची रीत आमचे कुलांत नाहीं.** ह्यांचा वध करण्यांत पातक तर आहेच; परंतु ह्यांना नुसतें जिंकण्यांत देखील अपकीर्ति आहे. आतां आपण मात्र जरी मारलेत तरी मी आपल्या पायींच पडेन.

————

## संत कबीर.

जग भये उफराटे । झुटेकू साहेब कैसा भेटे ॥धृ०॥
फत्तर उप्पर शेंदूर डारे । मुरख कहे ये देव मोटे ॥
लडकाजी खातर नवस किये । देवकू नारळ फुटे ॥१॥
देवके आगे डारे कटोरे । आपण खागये गोटे ॥ २ ॥
सजींव बकरा निर्जीव देवके आगे काटे । मिळगये
आलम खागये बकरा देवके हातमे झाटे ॥ ३ ॥
देनेवाला ओ है न्यारा सबदेव उनकू भेटे ।
कहत कबीरा मुरशद मौला रामरंग है लुटे ॥ ४ ॥

---

## श्रीवासुदेवानंदसरस्वति

### श्लोक.

श्रीदत्त देवस्य हि पृष्ठतः स्थिता ।
गोपालकृष्णेनच सर्वतोऽविता ।
माताच या रुद्रगणस्य विश्रुता ।
तापावसूनां दुहिता श्रुतिस्तुता ॥ १ ॥
विश्वाघहादित्य गणस्वसा मता ।
जन्मादि संकष्ट हरा निषेविता ।
यज्ञ क्रिया साधन कृन्मुनीडिता ।
तेंजस्विनी साऽवतु कामधुग्मता ॥२॥

## अभंग

श्रीगुरुदत्तात्रेय जिला पृष्ठभागीं ॥
धरिती विरागी असोनी ही ॥ १ ॥
वसिष्ठादि मुनि पाळिती जियेसी ॥
जी वंद्य वेदासी ती गोमाता ॥ २ ॥
स्वयें हातीं काठी घेवोनियां पाठी ।
राहुनि जगजेठी कृष्ण राखी ॥ ३ ॥
यज्ञसाधनभूता अशी ही गोमाता ।
वासुदेव चित्ता आवडली ॥ ४ ॥

२

रुद्रांची जी माता । वसूंची दुहिता ॥
भगिनी विख्याता आदित्यांची ॥ १ ॥
नाभीं अमृताची सज्जन हो साची ।
तारिणी आमुची हे गोमाता ॥ २ ॥
हो कां आस्थिगत तरी तेंहि पाप ॥
पंचगव्य साफ घालवी हो ॥ ३ ॥
घृतदहींदुग्ध अभिषेकीं प्रीति ।
देवता करिती जयाचिया ॥ ४ ॥
त्या गोदेवतांचें नाम घतां वाचे ।
ह्या वासुदेवाचें रमे मन ॥ ५ ॥

### पद

उद्धरि गोमाता समस्तां । उद्धरि गोमाता ॥ धृ० ॥
ध्यातां पहातां स्पर्शहि करितां तारी जी प्रणतां ॥ १ ॥
गोमय जीचें गद शोकांता । करिते सर्वनता ॥ २ ॥
परगति देती करितां भक्ति । ऋषभांची कांता ॥ ३ ॥
गंगासम यत्पुच्छ जलांते । पीतां ये सुचितां ॥ ४ ॥
बद्धजविरजस्ता दे शिवता । ते हे गोमाता ॥ ५ ॥

---

## बालकरामदासकिंकर.

### गोमातेची भूपाळी.

प्रातःकाळीं उठा उठा । माते गायत्रीसी भेटा । अगाध सुकृताचा सांठा । मोक्ष द्वारवंटा उघडेल ॥ धृ० ॥ हस्तें पृष्ठी कुरवाळावी । कंडु ग्रीवा तोषवावी । पुच्छाग्रेंही मुखीं फिरवावीं । गोमूत्र घ्यावें आवडीं ॥ १ ॥ कमलेची ही कनिष्ठ भगिनी । नामें कामधेनु जननी । इचा वास जये स्थानीं । तये भुवनीं इंदिरा॥२॥ प्रदक्षिणा तीन करितां । चरणीं ठवितां माथां । अनंत जन्मींच्या दुरिता । हरण तत्वता करिती हे ॥ ३ ॥ श्रौत स्मार्त जीं जीं कर्में । इच्यानें पूर्ण सर्व कामें । संतवृत्ती मनोधर्में । अकाम भावें कर्मियेडीं ॥ ४ ॥ इच्यानें मंत्र अर्ध्यदानें । सुरांसी मोक्षमार्ग होणें । ब्राह्मणांचीं जीं ब्राह्मण्यें वेदाध्ययनें इजयोगें ॥ ५ ॥ जिच्यानें रामकृष्ण अवतार । जिच्यानें पृथ्वीचा उद्धार ।

जिच्यानें दैत्यांचा संहार । गोआधार विश्वाचा ॥ ६ ॥ श्रुतिस्मृति पुराण संत । मुनिवर वसिष्ठादि विख्यात । गोकुळीं बालकृष्ण दिनरात । चरण रजांत लोळतसे ॥ ७ ॥

## धेनुपाठ.

(वारकरी संप्रदायांत 'हरिपाठा' चे अभंग जसे नित्य नियमानें म्हटले जातात. तसेंच गोपूजन करणाऱ्या भाविकाला मग तो वारकरी असो, रामदासी असो, दत्तोपासक असो अथवा कोणत्याही संप्रदायाचा असो, त्याला गोपूजनाचे वेळीं नित्य नियमानें म्हणण्यासाठीं हा "घेनुपाठ" लिहिला आहें. भाविकांनीं गोपूजनाचा नित्य नियम ठेऊन त्यावेळीं हा पाठ म्हणावा अशी विनंति आहे.)

### अभंग १ ला.

नमो नारायणा नमोजी देवेंद्रा । आधीं भुवनाधारा नमस्कारू ॥
गायत्रीचें स्तोत्र व्यासांनीं वर्णिलें । तेंचि वाखाणिलें अभंगासी ॥
पापातें संहरी इच्छापूर्ण करी । अभंगल हरी गीत गातां ॥
शिंगावरी व्यास मध्यें सदाशिव । मुळापाशीं ठाव अंबिकेचा ॥
विष्णूचें स्वरूप गाईसी जाणावें । दैत्यास नेणवें बाळ म्हणे ॥

२

मस्तकीं तो ब्रह्मा स्कंधावरी गुरु । कपाळीं शंकरु वृषभध्वज ॥
अश्विनी कुमार कर्णासी साजिरे । नेत्र हे गोजिरे सूर्यचंद्र ॥
दंतामाजी कवी जिव्हे सरस्वती । अमर शोभती उरु माजी ॥
खुराग्रे पर्वत गंधर्व अप्सरा । श्रोणिदेशीं पितरा वास झाला ॥
भ्रुकुटीं त्रिगुण रोमीं ऋषी वास । चर्मीं प्रजापतीस ठाव दिला

मर्कटासी रत्न गर्दभा मिष्टान्न । धेनु नसे मान्य चांडाळासी ॥

बाळ ह्मणे जाणा शुद्ध ज्याचें बीज । धेनु त्याला पूज्य देवा परी ॥

३

गोमयांत लक्ष्मी गोमुत्रांत गंगा । येती पापभंगा सर्व तीर्थें ॥

चारीहि सागर स्तनामाजीं जाणा । तिचा महिमा कोणा वर्णवेना ॥

पुच्छा माजी नाग काय सांगूं मात । विष्णुरूप संत सेवितातीं ॥

धेनु अग्रभागीं धेनु ही पाठीशी । धेनु सर्व देशीं राहो माझ्या ॥

गाईवीण घर जाणावें स्मशान । बाळ ह्मणे खुण अभक्ताची ॥

४

गाईशीं गोग्रास तुळसीचें पूजन । नंदाचा नंदन तेथें वसे ॥

शत ब्राह्मणाशीं देता अन्नदान । जाणा हें प्रमाण भारताचें ॥

ज्याचे घरीं गाय तेथें उणें काय । सर्वहि अपाय नष्ट होती ॥

गाईशी विकाल सुखाशीं मुकाल । द्रव्यरूपें घ्याल नर्क हातीं ॥

अस्सल जातीचा न करी निंद्यकाम । सदा मेघःशाम तयापाशीं ॥

बाळ ह्मणे माते नका लावूं डाग । सुख दुःख भोग दो दिसांचा ॥

५

पुच्छ फिरवावें सर्वांगा वरूनी । धन्य तोची जनीं भाग्यवंत ॥१॥

दारिद्र्य कलह रोग जाय दुरी । खेळतसे हरी धेनुसंगे ॥ २ ॥

विधि हरीहर झाले तिचे दास । ह्मणूनी बाळास ध्यास तीचा॥ ३ ॥

६

धेनुपाठ नित्य करील पठण । तया नारायण सांभाळील ॥ १ ॥

ब्राह्मणातें विद्या क्षत्रियातें राज्य । गर्भिणी ते पूज्य पुत्र लाभे ॥२॥

सायंकाळीं गातां विघ्न जाये दुरी । रात्रंदिनी करी पठणासी ॥३॥
सर्व पापनाश तोषे जगदीश । ऋद्धिसिद्धि त्यास ओळंगती ॥४॥
शत गोप्रदानें अर्थ घेतां चित्तीं । अखंड सांगाती पांडुरंग ॥५॥
दर्शनें स्पर्शनें महादोष जाती । पुराणें वर्णिती बाळ ह्मणे ॥६॥

७

आली महान् दिपवाळी । धेनुमातेसी सांभाळी ॥ १ ॥
नको करूं तिचा त्याग । तुला पावेल श्रीरंग ॥ २ ॥
घरीं तुळस आणि गाय । तेथे गोपाळाचे पाय ॥ ३ ॥
जेथें गायत्रीचा वास । त्याचा पांडुरंग दास ॥ ४ ॥
सर्व तीर्थें तया ठाया । येती तयासी सेवाया ॥ ५ ॥
ऐसा गायत्री महिमा । बाळ ह्मणे झाली सीमा ॥ ६ ॥

धेनुपाठ समाप्त.

---

## अभंग १ ला.

जरी तुह्मा देव व्हावा । करा गायत्रीची सेवा ॥ १ ॥
गाय धर्माचें भूषण । म्हणुनी सेवी नारायण ॥ २ ॥
घेई गोकुळीं अवतार । सेवा करी शारङ्गधर ॥ ३ ॥
हिंडतसे धेनूपाठीं नामें गोपाळ जगजेठी ॥ ४ ॥
धेनुद्रोही जो कां नर । बाळ ह्मणे जाणा खर ॥ ५ ॥

२

होतो दैत्याचा संसर्ग । झाले कसायांचे वर्ग ॥ १ ॥
हिंदु कसाई मातले । धेनु बाजार घातले ॥ २ ॥

धेनु कन्येचा विकरा । करिती राजरोस खरा ॥ ३ ॥
हिंदु कसायांच्या जाती । बाळ म्हणे सांगू किती ॥४॥

३

क्षेत्र पुरोहित घेती गोप्रदान । स्वार्थ परायण होऊनीयां ॥ १ ॥
दाखविती जना धेनूचें पूजन । परी पूर्ण मन स्वार्थावरी ॥ २ ॥
नेणती ते विप्र धेनूचा प्रसंग । जाणा अंतरंग कसायांचें ॥ ३ ॥
बाळ ह्मणे अशी दुर्बुद्धी ब्राह्मणा । ह्मणोनी यातना पाठीं लागीं ॥ ४ ॥

४

म्हणवी हरी दास । न करी गाईचा हव्यास ॥
हरी धावे धेनुपाठी । दास पोटासाठीं कष्टी ॥
वर्णी गोकुळाचा रंग । नेणें धेनूचा प्रसंग ॥
सजे नटाचीया परी । एक गाय नाहीं घरीं ॥
ह्मणावितां ज्याचे दास । बाळ ह्मणे स्मरा त्यास ॥ ३ ॥

५

धेनु प्रत्यक्ष शंकर । नंदी तियेचा किंकर ॥ १ ॥
शैव जाणतील वर्म । कैसें होतसें दुष्कर्म ॥ २ ॥
नव्हे गाईचा हा वध । खून शंकराचा शुद्ध ॥ ३ ॥
पुसा आचार्यांसी बोध । धेनुरक्षणीं व्हा सिद्ध ॥ ४ ॥
व्यास महर्षि सांगती । तेथें बाळ बोले किती ॥ ४ ॥

६

विष्णु स्वरूपिणी गाय । तिला प्रसंग हा काय ॥ १ ॥
काय वैष्णव नेणती । विष्णुमूर्तिची फजिती ॥ २ ॥
लक्षावधि विष्णुमूर्ति । नष्ट चांडाळ कापिती ॥ ३ ॥
धेनुसंकटीं धावाल । बाळ म्हणे धन्य व्हाल ॥ ४ ॥

७

अहो तुम्ही विप्रवर्य । आचरितां धर्म कार्य ॥ १ ॥
धर्मकर्माची देवता । विस्मरला धेनुमाता ॥ २ ॥
तुम्हां आधी तिचें नाम । चारी पुरुषार्थ विश्राम ॥
ऐसा तिचा बडिवार । म्हणुनि सेवी शार्ङ्गधर ॥
समर्थि ठेवा आठवण । बाळ घाली लोटांगण ॥

८

तुम्हांपाशीं अवघे मंत्र । हविर्द्रव्यें हीं पवित्र ॥
ऐक्य कासया मी वानूं । उभयांचि एक तनू ॥
धेनु आपुलें मस्तक । काय सांगावे अधिक ॥
मस्तक उडतां देह पडे ; मग अवघे होतें मढें ॥
आली ब्राह्मणां प्रचिती । बाळ ह्मणे सांगो किती ॥

९

कसायांचे षष्ठ भेद । करूं अभंगानें बोध ॥
धेनुवधा अनुमोदन । एक कसाई तो जाण ॥
विक्री कसायाचे करीं । दूजा कसाई निर्धारी ॥
तिजा प्रत्यक्ष जो मारी । चौथा छिन्नभिन्न करीं ॥
पांचवा जो पाक करी । षष्ठ मांस पोटीं भरी ।
अवघे कसाई हे मुख्य । बाळ म्हणे सांडा सख्य ॥

## गोपाळकाला.

### गौळण.

“ मासिं बोलुं नको गोपाळा । मसि आला तुझा राग”॥धृ०॥
मजसाठीं अवतरलासी । मजसंगें क्रीडा करिसी ।
यावेळीं दंडासि कशाला रे ॥ मसि० ॥ १ ॥

मजसाठीं वेणू धरिली । मजसाठीं नामें वरिली ।
आज त्याचा डौल कशाला रे । मसि० ॥ २
मजसाठीं गोकुळवासी । वधिल्या त्वां दानवराशीं ।
आज त्याची कीर्ति कशाला रे । मसि० ॥ ३
मम पदरज माथां घेसी । गोवर्धन धारण करिसी ।
देशी कां ताव मिशाला रे । मसि० ॥ ४
जरि असशील जित जगताला । तरि येशील आज बघण्याला ।
गोवध खल करिती कशाला रे । मसि० ॥ ५
रुधिराची वाहते यमुना । मांसाचे पर्वत नाना ।
या समयीं येशी कशाला ? रे मसि० ॥ ६
जे भारतवासी संत । गोपाळ ह्मणति निभ्रांत ।
ह्मणुनी हे करिती काला रे । मसि० ॥ ७
श्रीविठ्ठल गोकुळनाथा चरणावरी धरिते माथा ॥
बघसी हा अंत कशाला रे ॥ मसि० ॥ ८
पूर्वी त्वां रक्षियलेसी । आजि बौद्ध होउनी बससी ॥
प्रभु खाली बघसि कशाला रे ॥ मसि० ॥ ९
समचरण विटेवरि धरिसी । मजसाठिं विषमता वरिशी ॥
जघनीकर देसी कशालारे ॥ मसि० ॥ १० ॥
सज्जनगण मज विस्मरला । वरपंगी अवघा भरला ॥
स्मितवदनें पाहासि कशालारे ॥ मसि० ॥११॥
ये धांव यशोदाबाळा । डरतोसी काय कलिकाला ।
निष्ठुर मी बोलुं कशाला रे । मसि० ॥१२॥

## पद

( चाल—चंद्रकांत राजाची )

आर्य पुत्र गोपाळ बना रे वेळ बहुत गेला ।
गोमातेचा नाश होतसे होय कसा काला ? ॥ धृ० ॥
गोकाळांनीं प्रळय मांडिला बघतां काय असें ॥
या काल्यानें वर्म नेणती सारे लोक पिसे ॥
ज्ञानेश्वर गुरु नाथ समर्था बघुनी येत हंसे ॥
निज धर्माचें कर्म नेणतां झाले काय कसे ॥
दया शून्य अनुयायी गण हा पाहुनियां आपुला ॥
गोमातेचा नाश होतसे होय कसा काला ? ॥ १ ॥
यमुनातीरीं खेळ मांडिला कृष्ण गडी ज्यांचा ॥
गोप गोपी गो मिळुनी सारे जन तो दैवाचा ॥
पूर्ण ब्रह्म हरि सर्वोत्तम प्रिय सखा गोवळ्यांचा ॥
हरि प्रसादा पात्र गोप हे लाग न अमरांचा ॥
गोपाल तुह्मी वेनुसी तोषवा भारत मातेला ॥ २ ॥
गोकुळ कोठें श्रीहरी कोठें गोपाळ न दिसती ॥
गोरस नसतां काला कैचा संत तुह्मां हंसती ॥
शिवाजी बाजी वीर शिरोमणी खेद मनीं करिती ॥
नामधारी हे क्षत्रिय कां नच नामशेष होती ॥
षंढासम हो कैसें बघतां कर ठेउनि भाला ॥ ३ ॥
उत्साहाचे तत्त्व शेवटीं जरी हृदयीं गवसे
आर्यपुत्र हे जिवंत असुनी दिसती कां शवसे ? ।
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र हे हरिभजनीं न वसे ।
हरिभक्तीचें वर्म जाणतां होती माधवसे ।
गोपालांची कंठी पडली न दिसे कामाला ॥ ४ ॥

वैदिक शास्त्री पुराणीक हरीदास भक्त प्रभुचे ॥
या काव्याचें वर्म जनाला वदोत निज वाचे ॥
श्रीहरीचें गोदैवत असतां काय नसे यांचें ? ॥
गोरक्ताचे पाट पाहुनी स्वस्थ हृदय कैचे ॥
आर्य धर्म हा त्वरित जागवा दान हेंचि बाला ॥ ५ ॥

## श्लोक.

' गोपाळकाला ' हृदयीं स्मरारे । गो-पाळकाला हृदयीं स्मरारे ॥
' गोपाळका ' ला हृदयीं स्मरारें । गोपाल-काला हृदयीं स्मरारे ॥ १ ॥
गोपाळकाला करितां कसारे । गोपाळ गेले विलयास सारे ॥
गोपाल आधीं बनुनी जगांत । गोपाळकाला करितात संत ॥ २ ॥
गोकूळ सारे विलयास जातें । गोपाळकाला करण्यां न नाते ॥
गोरक्षणी सिद्ध आधी बनावे । तरी आर्य संतान ऐसें ह्मणावें ॥
गोभक्षकासी विकणार गाई । न आर्य संतान खरे कसाई ।
गोरक्षणासी विपरीत त्याचा । संदेह ना दोन असे पित्याचा ॥ ४ ॥

## आरती.

धेनूमाय जगज्जननी । लोकत्रय-त्रितापशमनी ॥
अखिल जगतास मोक्षदानी ॥ जिचेनी सालंकृत अवनी ॥
॥चाल॥ निगमागमीं जिला गाती ॥ वंदिति सुरवर मुनिजन, पुनित पतित जन, घेतां दर्शन । प्रियकर शिवसांभा सुरभी सौख्यद जगदंबा ॥ धेनू० ॥ १ ॥

गोमूत्रांत वसे गंगा । कमला गोमयांतरंगा ॥
अखिल देवता जिचे अंगा । सदा जी प्रियकर श्रीरंगा ॥
चाल-जियेचे नेत्र सूर्यचंद्र । पहा ऊपेंद्र, गोकुळीं कृष्ण बाळ अवतार नवमीं गोवर्धन धरुनी । रक्षि गोवत्स कृपा करुनी, धेनू० ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्था. क्र. ३२५०

# गोसेवेचे मार्ग.

आपल्या हातून कांहीं तरी गोसेवा घडावी, असें ज्यांना मनापासून वाटतें, त्यांनीं पुढील मार्गांपैकीं कोणत्या तरी मार्गाचा अवलंब करावाः—

१ घरीं स्वतःगाय बाळगावी व तिची योग्य शुश्रुषा करावी.

२ गोमातेची नित्य मनोभावें पूजा करून तिला गोग्रास समर्पण करावा.

३ आठवड्यांत एक वेळ गुरांच्या बाजारांत जाऊन गोरक्षणीय वर्तमानपत्रांतील लेख वाचून दाखवून व धर्मोपदेशाच्या दोन गोष्टी सांगून शेतकरी बंधूंना गोरक्षणाचें महत्व समजावून द्यावें.

४ एक मूठभर धान्य अथवा पै पैसा गोरक्षणकार्याला अर्पण करण्यासाठीं आपल्या घरांत एक पिशवी ठेऊन त्यांत सांठवावा व आपल्या माहितीच्या गोरक्षणसंस्थेकडे नियमितपणें ती मदत पाठ [illegible]

५ आपल्या दु [illegible] रक्षण-धर्मादाय-पेटी ठेवावीं व तिच [illegible] जतांना आठवणीनें आणा अर्धाआणा [illegible]

REFBK-0003152
REFBK-0003152

८ एकदांच २५ रुपये भरून संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक गोरक्षण वृत्तपत्राला आश्रय द्यावा. म्हणजे पत्र सतत भेट मिळेल. निदान वर्षाला ३॥४ भरून वर्गणीदार व्हावें.

९ साप्ताहिक 'गोरक्षण' चा गांवोगांवच नव्हे तर घरोघर प्रसार होईल अशाविषयीं नित्य खटपट चालू ठेवावी.

संस्थेचे अहवाल मागवा व मदत करा.

श्रीगोवर्धनसंस्था कचेरी,

कांदेवाडी मुंबई नं. ४.

Printed by:—Jayaram Bapujee Malp
Shree Gowardhan Press, Khetwadi 9t
Alleraki Building, Block C.

Published by:-Shankar Sakharam Dole,
etary Shree Gowardhan Sanstha Kan
Bombay No. 4.